# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

वित्त व लेखा विभाग

आय.एस.ओ.९००१-२००८ युनिट

## परिपत्रक

**विषय :- महाविद्यालयांची बँक खातेविषयक माहिती संगणकावर उपलब्ध करुन देणेबाबत...**

आपणास विदित आहेच की, भारत सरकारने वित्तिय क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात अनेक पावले उचलली आहेत. या अनुषंगाने रोख विरहीत अर्थव्यवहार करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच "इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर पध्दतीचा" अवलंब करण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयांना देय असणा-या रकमा यापुढे संबंधित बँक खात्यावर वर्ग करण्याचे नियोजित केले आहे. तरी आपणास कळविण्यात येते की, सर्व संलग्न महाविद्यालयांनी खाली नमूद केलेल्या लिंकवर महाविद्यालयाच्या बँक खात्याची सविस्तर माहिती अपलोड करावी.

http://bcud.unipune.ac.in/CollegeDetails/ExistingCollege/College_BankInfo.aspx

**OR**

BCUD College Login -->After college Login Go to Main Menu --> Click College Details -->Click Finance Bank Details.

विद्यापीठाकडून देय असणा-या विविध रकमांसाठी महाविद्यालयाकडे स्वतंत्र बँक खाती ठेवली जातात. परीक्षा खर्च, शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, संशोधन अनुदान (Research Grant) इ. महाविद्यालयांनी बँक खात्यांची माहिती भरत असताना या संदर्भात दक्षता घेऊन त्या त्या बँक खात्याची माहिती भरुन सहकार्य करावे. संगणकप्रणालीद्वारे या माहितीचा वापर करुन महाविद्यालयांना त्या त्या बँक खात्यामध्ये संबंधित अनुदानाच्या रकमा वर्ग करण्यात येणार आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

Gargote 30/12/17

**सीए. (डॉ.) विद्या गारगोटे**
**वित्त व लेखा अधिकारी**
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१७-१८/१७०८
दिनांक : ३०/१२/२०१७

\\ADMIN7\d\d\AMOL GHODE\Gargote Madam\Paripatrak.doc